ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– II (B) March – April, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

# डिजिटल क्रांती आणि मराठी भाषा-साहित्यतज्ज्ञांसाठी गिग कार्यप्रणालीमधील संधी आणि आव्हाने

* प्रा. शैलेश औटी

*मराठी विभाग, अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसई रोड (पश्चिम), ४०१२०२*

**सारांश :**

**प्रास्ताविक:**

*गिग इकॉनॉमी म्हणजे तंत्रज्ञानाच्या मदतीने तात्पुरती व लवचिक स्वरूपाची कामे करण्याची प्रणाली. डिजिटल क्रांतीमुळे या कार्यप्रणालीत वेगाने वाढ झाली असून, पारंपरिक नोकऱ्यांच्या तुलनेत अधिक स्वातंत्र्य आणि संधी उपलब्ध होत आहेत. उदारीकरणानंतर रोजगाराच्या संकल्पनेत बदल झाला असून, सेवाक्षेत्राला महत्त्व आले आहे.*

**गिग कार्यप्रणालीमधील संधी:**

*मराठी भाषा आणि साहित्य तज्ज्ञांसाठी लेखन, भाषांतर, संपादन यांसारख्या विविध संधी उपलब्ध आहेत. डिजिटल माध्यमांमधील वाढत्या मागणीमुळे ऑनलाइन शिक्षण, पॉडकास्टिंग, ब्लॉगिंग, डिजिटल मार्केटिंग, सोशल मीडिया व्यवस्थापन आणि आशय निर्मिती या क्षेत्रांत रोजगारनिर्मिती होत आहे. ई-बुक्स आणि मराठी कंटेंटला वाढती मागणी आहे, ज्यामुळे लेखक व संपादकांसाठी नवे मंच उपलब्ध झाले आहेत.*

**मुख्य आव्हाने:**

*यासोबतच आर्थिक अस्थिरता, सामाजिक सुरक्षा अभाव, आणि तांत्रिक कौशल्यांचे सातत्याने अद्ययावत होण्याची गरज ही मोठी आव्हाने आहेत. गिग इकॉनॉमीमध्ये स्थिर उत्पन्नाची अनिश्चितता असून, विमा, निवृत्तीवेतन यांसारख्या सुविधा मिळत नाहीत. तसेच, दर्जेदार साहित्यनिर्मितीपेक्षा वेगावर अधिक भर दिला जात असल्याने गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो.*

**निष्कर्ष:**

*तंत्रज्ञानाशी जुळवून घेतल्यास मराठी भाषा-साहित्यतज्ज्ञांना गिग इकॉनॉमीमध्ये यशस्वी कारकीर्द घडवता येईल. मात्र, या कार्यप्रणालीतील स्पर्धा, अस्थैर्य आणि असुरक्षिततेशी सामना करण्यासाठी सर्वांगीण विचार आणि धोरणात्मक उपाययोजना आवश्यक आहेत.*

***बीज शब्द (key word) :*** *Gig Work System (गिग कार्यप्रणाली), Digital Platforms (डिजिटल मंच), Economic Liberalization (आर्थिक उदारीकरण), Neoliberalism (नवभांडवलशाही), Freelancing (मुक्त रोजगार), Content Writing (आशय निर्मिती), Scriptwriting (पटकथा लेखन), Translation and Localization (भाषांतर आणि स्थानिकीकरण), Self-Publishing (स्वयंप्रकाशन), Podcasting (पॉडकास्टिंग), Audiobooks (ऑडिओबुक्स), OTT*

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– II (B) March – April, 2025

OPEN ACCESS Original Research Article

*Platforms (OTT मंच), Social Media Management (समाजमाध्यम व्यवस्थापन), Job Insecurity (रोजगार अस्थैर्य). सामाजिक सुरक्षिततेचा अभाव (Lack of social Security), ताणतणाव (Stress), नवी आर्थिक सरंजामशाही (New Economic Feudalism)*

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रास्ताविक (हेतूकथन) :**

प्रस्तुत दोन दिवसीय चर्चासत्राची संकल्पना अथवा विषयवस्तू *'भविष्यातील कार्य : गिग अर्थव्यवस्थेसाठी वाणिज्य पदवीधरांना तयार करणे'* ही आहे. अर्थातच मानव्यविद्येचा विशेषत: भाषा आणि साहित्याचा अभ्यासक म्हणून प्रस्तुत विषयाकडे पाहाताना गिग कार्यप्रणालीसंबंधीची सद्यस्थिती, भाषा आणि साहित्य यांच्या अभ्यासकांसाठी उपलब्ध संधी आणि आव्हाने विचारात घेतली आहेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात संगणकीय प्रणाली अधिकाधिक उत्क्रांत होत आंतरजालाने जोडल्या जाऊन माणसाच्या एकंदर जीवनशैलीमध्ये, त्याच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनात जी परिवर्तने झाली, तसेच होऊ घातली आहेत त्यासंदर्भातील विविध पैलूंवर चर्चा व्हावी त्याचप्रमाणे उपयुक्ततावादाच्या पलीकडे जात या कार्यप्रणालीच्या गुणदोषांची मानवी दृष्टिकोनातून चिकित्सा व्हावी या हेतूने उपरोक्त विषयाची निवड केली आहे. भाषा आणि साहित्याच्या अभ्यासात, ज्ञानाच्या उपयोजनात तसेच रोजगाराच्या संकल्पनेत या संगणकीय क्रांतीने घडून आलेले बदल, पुस्तकांच्या निर्मितीप्रक्रियेतील टंकलेखन, मुद्रितशोधन, त्याचे वितरण, विपणन आणि तत्सम संबंधित क्षेत्रांमध्ये संगणक, आंतरजाल, डिजिटल उपकरणे आणि विविध सॉफटवेअर्स, डिजिटल मंच यांच्या वाढत्या वापरामधून डिजिटल क्रांतीला सन्मुख होणारे या क्षेत्रातील लोक कोणत्या संधी आणि आव्हानांना सामोरे जात आहेत याचा विचार प्रस्तुत निबंधात करायचा आहे.

**शब्दप्रयोग आणि संज्ञांबाबत स्पष्टीकरण :**

आंतरजालीय संगणकीय प्रणालीमधून उपलब्ध झालेल्या डिजिटल मंचांच्या आधारे सेवाप्रदाते आणि उपभोक्ते यांच्यातील परस्परसंवाद आणि आर्थिक व्यवहारांमध्ये सुकरता आली आहे. त्यामुळे Platform based Economy या नावानेही या कार्यप्रणालीला संबोधले जाते. या संकल्पनेसाठी मराठीमध्ये 'आभासी मंचाधिष्ठित अल्पकालीन मुक्त सेवा व रोजगार प्रदायक कार्यप्रणाली' अशी वर्णनात्मक संज्ञा देता येऊ शकेल. मात्र प्रस्तुत निबंधात विवेचनाचा ओघ राखण्याच्या दृष्टीने 'गिग कार्यप्रणाली' (Gig Work System) असाच सुटसुटीत शब्दप्रयोग यापुढे केला आहे. यासंदर्भात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा की, अल्प मोबदल्यात, माणसाचे एखाद्या उपयुक्त पशूमध्ये अथवा यंत्रामध्ये रूपांतर करू पाहाणाऱ्या आणि शोषणावर आधारित

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– II (B) March – April, 2025

OPEN ACCESS Original Research Article

अशा या नवभांडवलशाहीप्रणीत कार्यप्रणालीला 'अर्थव्यवस्था' असे संबोधून प्रतिष्ठित करण्याची आवश्यकता नाही असे प्रस्तुत अभ्यासकाचे मत आहे, त्यामुळे 'Gig Economy' या संज्ञेसाठी सांप्रत काळात प्रचारात असलेला 'गिग अर्थव्यवस्था' हा प्रतिशब्द न योजता प्रस्तुत निबंधात 'गिग कार्यप्रणाली' (Gig Work System) अशी संज्ञा या निबंधात योजली आहे. आवश्यक तेथे संकल्पनांचे मराठीत रूढ असणाऱ्या संज्ञांच्या आधारे भाषांतर अथवा मराठीकरण केले आहे मात्र काही ठिकाणी आकलनसुलभतेच्या दृष्टीने तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तसेच डिजिटल माध्यमांच्या विश्वात रूढ असलेल्या प्रचलित इंग्रजी संज्ञा-संकल्पना यथामूल ठेवल्या आहेत.

**गिग कार्यप्रणालीची पार्श्वभूमी, 'गिग' ह्या संज्ञेचा इतिहास आणि स्वरूपवैशिष्ट्ये :**

गिग अर्थव्यवस्थेची पार्श्वभूमी आणि 'गिग' ह्या संज्ञेचा इतिहास पाहिल्यास असे दिसते की "गिग" ही संज्ञा मूलतः संगीताच्या क्षेत्रात सर्वप्रथम वापरली गेली आहे, जिथे संगीतकार त्यांच्या अल्पकालीन कामगिरीला "गिग" असे संबोधत असत. २० व्या शतकाच्या सुरुवातीला प्रामुख्याने जाझ आणि रॉक संगीतकारांनी गिग ह्या संज्ञेचा वापर आपल्या तात्पुरत्या उपक्रमांच्या संदर्भात केल्याचे दिसते. कालांतराने, या संज्ञेचा अर्थविस्तार होऊन ती अधिक व्यापक संदर्भात योजली जाऊ लागली आणि कोणत्याही तात्पुरत्या किंवा स्वतंत्र कामाचा समावेश करण्यासाठी या शब्दाच्या अर्थाचा विस्तार झाला.

"एका निश्चित नियोक्त्यासाठी पूर्णवेळ काम करण्याऐवजी लोकांनी तात्पुरत्या नोकऱ्या स्वीकारणे किंवा स्वतंत्र कामांचे तुकडे करून प्रत्येकाचे वेगळे पैसे मिळवणे यावर आधारित काम करण्याची पद्धती" असे केंब्रिज शब्दकोशात या संकल्पनेचे वर्णन आढळते (Cambridge Dictionary, n.d.)

**१.१ रोजगाराच्या संकल्पनेत बदल आणि गिग अर्थव्यवस्थेचा सेवाक्षेत्रावर असलेला भर :**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात विचार केल्यास गेल्या काही दशकांत, विशेषत: १९९० नंतरच्या काळात भारताने मुक्त अर्थव्यवस्थेचा अंगिकार केल्यापासून रोजगाराच्या संकल्पनेत बदल होत गेले आहेत. खासगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरण यांच्या काळात रोजगारसंधी आणि कार्यसंस्कृती यांमध्ये झपाट्याने बदल होत गेले आहेत. काळ आणि अवकाशाच्या मर्यादांनी घट्ट बांधलेल्या पारंपरिक नियमित नोकरीपेक्षा तात्पुरत्या आणि लवचिक स्वरूपाच्या नोकऱ्यांची उपलब्धता (आणि नाईलाजाने मागणीही) वाढली आहे. या नव्या रोजगार व्यवस्थेला अथवा कार्यप्रणालीला 'गिग अर्थव्यवस्था' असे संबोधले जाते. गिग कार्यप्रणालीमध्ये कर्मचारी स्वतंत्रपणे वेगवेगळ्या कंपन्यांसाठी किंवा ग्राहकांसाठी ठराविक करारांवर काम करतात. असे स्वयंरोजगारकर्ते (मुक्त कर्मचारी), स्वतंत्र कंत्राटी कर्मचारी, तात्पुरती कामे करणारे कर्मचारी हे गिग अर्थव्यवस्थेच्या तळाशी असलेले मूलभूत सेवाप्रदायक घटक म्हणता येतील. डिजिटल तंत्रज्ञानाच्या विकासामुळे ही संकल्पना अधिकच वेगाने फोफावत आहे. पारंपरिक पूर्णवेळ नोकरीऐवजी येथे स्वतंत्ररित्या तात्पुरत्या कामांवर भर दिला जातो. या दृष्टीने गिग अर्थव्यवस्थेचा भर हा प्रमुख्याने सेवाक्षेत्रावरच असल्याचे दिसून येते. या अर्थव्यवस्थेत कर्मचारी आणि कंपन्यांमधील संबंध

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– II (B) March – April, 2025

OPEN ACCESS Original Research Article

अल्पकालीन, अंशकालीन, प्रकल्पाधारित किंवा तात्पुरत्या कराराच्या स्वरूपाचा असतो. डिजिटल मंचाच्या (Digital Platforms) मदतीने गिग कर्मचारी आणि ग्राहक यांच्यातील संपर्क सुलभ होतो.

आपल्या मुख्य विषयाची मांडणी करण्याच्या दृष्टीने पार्श्वभूमीदाखल या कार्यप्रणालीचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये प्राथमिक पातळीवर पुढीलप्रमाणे मांडता येतील.

**१.२ गिग कार्यप्रणालीचे स्वरूप आणि बाजारव्यवस्थेला पूरक पोषक वैशिष्ट्ये :**

गिग कार्यप्रणालीमध्ये गिग कर्मचारी (Gig Workers), डिजिटल मंच (Digital Platforms) कंपन्या आणि ग्राहक अथवा उपभोक्ते हे प्रमुख घटक असतात. गिग कार्यप्रणालीमुळे कर्मचारी, कंपन्या आणि ग्राहक सर्वांनाच वेगवेगळे फायदे मिळतात. कर्मचाऱ्यांसाठी लवचिकता, अतिरिक्त उत्पन्न, कामाच्या विविध संधी या जमेच्या बाजू म्हणता येतील. तर कंपन्यांच्या बाजूने विचार केल्यास कमी गुंतवणूक आणि अल्प मोबदल्यात कामे साधली जात असल्याने खर्चात मोठीच कपात होऊन नफा वाढतो. दूरसंचार साधनांच्या आणि संपर्कयंत्रणेच्या साहाय्याने उभारलेले व संचालित केले जाणारे परस्परसंबंधांचे कार्यक्षम जाळे हेच सेवाक्षेत्रातील अनेक कंपन्यांचे बलस्थान असल्याने एनवेळी अनेक पर्यायी व्यवस्था उभारण्याची क्षमता या कंपन्यांकडे असते. त्यामुळे तातडीच्या गरजांसाठी कंपन्यांना जलदगतीने योग्य कर्मचारी मिळू शकतात. कर्मचाऱ्यांनाही सातत्यपूर्ण स्पर्धेला सामोरे जावे लागत असल्याने ग्राहकाकडून चांगले ऑनलाईन प्रतिसाद अथवा मूल्यमापन प्राप्त करण्याच्या दृष्टीने कार्यक्षमता आणि तत्परतायुक्त सेवा देणे या व्यवस्थेत क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे तत्परता आणि कार्यक्षमता राखली जाते. तसेच विशिष्ट कर्मचाऱ्याशी बांधले न गेल्यामुळे कंपन्यांसाठी अनेक पर्याय खुले राहातात आणि विशिष्ट प्रकल्पानुसार विशेष कौशल्ये असलेल्या लोकांना अल्पकाळासाठी नियुक्त करता येते. ऑनलाइन मंचांमुळे ग्राहकांना घरबसल्या, स्पर्धात्मक दरात व जलदगतीने विविध सेवा मिळतात. त्यामुळे गिग कार्यप्रणालीला अलिकडच्या काळात मोठी चालना मिळाल्याचे दिसत आहे.

**१.३ ‘गिग कार्यप्रणाली’ हे नवभांडवलशाहीचेच (Neoliberalism) अपत्य :**

२० व्या शतकात औद्योगीकरणाने कळस गाठला तसेच उत्पादनक्षेत्राच्या विस्ताराला मर्यादा येऊन सेवाक्षेत्र विस्तारू लागले. भांडवलशाही व्यवस्थेची पकड अधिक सूक्ष्मपणे व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून दृढ होऊ लागली. त्याचीच परिणती म्हणजे नफेखोरीच्या प्रेरणांमधून उदयाला आलेली गिग ही संकल्पना. सरकारी हस्तक्षेप आणि सरकारी निर्बंध टाळण्यावर या नवभांडवलशाहीचा भर असतो. देशाच्या मर्यादा ओलांडून मुक्त बाजारपेठेच्या पुरस्कारासोबतच खाजगीकरण, आर्थिक उदारीकरण (भांडवली विस्तारवाद) यावर भर देणारी ही आर्थिक आणि राजकीय विचारप्रणाली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे रूप धारण करणाऱ्या या नवभांडवलशाहीला अभिप्रेत असलेल्या बाजारामध्ये किमतींवर तसेच बाजारपेठेवरील मागणी आणि पुरवठा यावर सरकारचे अत्यंत नाममात्र असे नियंत्रण अपेक्षित असते. बाजारपेठेतील स्पर्धा आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांची आर्थिक वृद्धीची हाव यांमुळे भांडवलदारांकडून सामाजिक हित डावलले जाताना स्पष्ट दिसत आहे.(नूलकर,

2019) एकंदरीत कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला विरोधी स्वरूपाची बाजारप्रेरीत आणि ग्राहकवाद (Consumerism) अथवा चंगळवादधार्जिणी अशी व्यवस्था या नवभांडवलशाहीला अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकारच्या अनुदानांना तसेच व्यापारावरील निर्बंधांना फारसा वाव नसण्याकडे नवभांडवलशाहीचा स्वाभाविक कल असतो. थोडक्यात सांगायचे तर उपरोल्लेखित 'गिग कार्यप्रणाली' हे नवभांडवलशाहीचेच (Neoliberalism) अपत्य आहे. त्यामुळे या कार्यप्रणालीमधून स्वाभाविकपणेच कर्मचाऱ्यांच्या पातळीवर काही मानवी समस्याही उद्भवत आहेत आणि त्यांना दुर्लक्षित करून चालणार नाही. या समस्या, आव्हाने आणि अडचणी आणि उपाययोजना यांची चर्चा आपण शेवटच्या टप्प्यावर करणार आहोत.

२ भारतामधील सद्यस्थिती:- भारतात सध्या गिग कार्यप्रणाली वेगाने वाढत आहे. २०२९-३० पर्यंत भारतात गिग कर्मचाऱ्याची संख्या २.३५ कोटींपर्यंत पोहोचण्याचा अंदाज नीती आयोगाच्या २०२२ च्या अहवालामध्ये व्यक्त केला होता.[NITI Aayog, 2022]

**२.१ ई-कॉमर्स आणि डिलिव्हरी क्षेत्र :** या क्षेत्रांत स्विगी, झोमॅटो, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट यांच्या माध्यमातून लाखो लोक गिग कर्मचारी म्हणून काम करत आहेत.

**२.२ मुक्त रोजगार (Freelancing) आणि डिजिटल कौशल्ये:** कंटेंट रायटिंग, ग्राफिक डिझायनिंग, वेब डेव्हलपमेंटसारख्या डिजिटल कौशल्यांच्या जोरावर अनेक भारतीय गिग कार्यप्रणालीचा भाग होऊन गिग वर्किंग करत आहेत. ऑनलाइन शिक्षण: अनअकॅडेमी, बायजूज, वेदांतू यांसारख्या कंपन्यांमध्ये शिक्षकही गिग कर्मचारी म्हणून काम करत आहेत.

**३. डिजिटल क्रांतीमुळे उपलब्ध झालेले तंत्रज्ञान आणि खुली झालेली नवी क्षेत्रे:**

या पार्श्वभूमीवर प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आज डिजिटल क्रांतीमुळे उपलब्ध झालेले तंत्रज्ञान आणि खुली झालेली नवी क्षेत्रे यांच्या माध्यमातून भाषिक कौशल्यांना मिळणारे नवे आयाम लक्षात घेणे आवश्यक आहे.

**३.१ भाषा-साहित्यतज्ज्ञांना गिग कार्यप्रणालीमध्ये प्रविष्ट होण्यासाठी पारंपरिक ज्ञानाला नव्या कौशल्यांची जोड देण्याची आवश्यकता:**

भाषा-साहित्यतज्ज्ञांना आपली आजीविका आणि कारकीर्द घडविण्यासाठीचे पर्याय म्हणून शिक्षकी पेशा, पत्रकारिता, लेखन, संशोधन, संपादन, पुस्तकनिर्मिती व प्रकाशनव्यवसाय, भाषांतर, शब्दांकन, मुद्रितशोधन यांसारख्या क्षेत्रांचा उल्लेख केला जातो. वर उल्लेख केलेल्या क्षेत्रांमध्ये काम करण्यासाठी भाषा आणि साहित्य यांची उत्तम जाण, संवेदनशीलता, तर्कबुद्धी म्हणजेच भाषिक आणि साहित्यिक क्षमता (Linguistic and Literary competence) असण्याबरोबरच त्या त्या क्षेत्रांतील कार्यपद्धतीचे तांत्रिक ज्ञान म्हणजेच व्यावसायिक ज्ञान(Professional Knowledge) आणि तांत्रिक कौशल्ये(Technical Skills) आत्मसात करणे कोणत्याही काळात आवश्यक असते. मात्र, गिग कार्यप्रणाली आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे भाषा आणि साहित्याच्या तज्ज्ञांसाठी काही नवीन कौशल्यसंच अनिवार्य ठरले आहेत.[गोडबोले, 2022]

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– II (B) March – April, 2025

OPEN ACCESS Original Research Article

संगणकप्रधान डिजिटल युगात, गूगल तसेच बिंग, डकडकगो, यांडेक्स यांसारख्या शोध इंजिनांचा प्रभावी वापर करून वेगवान आणि अचूक माहिती मिळवण्याचे कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. डेटा मायनिंग (Data Mining), कीवर्ड रिसर्च (Keyword Research), आणि उन्नत शोध तंत्रज्ञान (Advanced Search Techniques) यांचा वापर करून अधिक विश्वासार्ह आणि प्रासंगिक माहिती मिळवता येते.

त्याशिवाय, संहिता, प्रतिमा, आणि चलचित्र (Text, Image, Video) या स्रोतांमधून विश्लेषणक्षमतेने माहिती संकलित करणे आणि ती योग्य प्रकारे वापरणे आवश्यक आहे. उदा. OCR (Optical Character Recognition) तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रतिमेतील मजकूर संपादनयोग्य स्वरूपात रूपांतरित करणे, AI-सहाय्यित भाषांतर (Machine Translation like Google Translate, DeepL, Microsoft Translator), तसेच ट्रान्सक्रिप्शन (Transcription Tools like Otter.ai, Sonix) यांचा उपयोग भाषा व साहित्य तज्ज्ञांसाठी उपयुक्त ठरतो.

मराठीतून डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करता यावा यासाठी युनिकोड मराठी टंकलेखन, गुगल व्हॉइस टायपिंग, गुगल लेन्स, ॲप-आधारित भाषांतर साधने (Microsoft Lens, SayHi Translate) यांचा वापर अनिवार्य झाला आहे.(मोरे, 2006) याशिवाय, विकिपीडिया लेखन, ब्लॉगिंग, एसईओ ऑप्टिमायझेशन (Search Engine Optimization), सोशल मीडिया मार्केटिंग (Social Media Marketing for Professional Growth), ई-बुक पब्लिशिंग (e-Book Publishing), आणि कंटेंट स्ट्रॅटेजी (Content Strategy) यांसारख्या कौशल्यांचा विचार करणेही गरजेचे आहे.

यासोबतच, संवाद आणि संप्रेषणाच्या विविध माध्यमांचा सफाईदार वापर, समाजमाध्यमांचा फक्त करमणुकीपुरता न वापरता व्यावसायिक वाढीसाठी उपयोग करणे महत्त्वाचे ठरते. उदाहरणार्थ, फ्रीलान्सिंग प्लॅटफॉर्म्स (Upwork, Fiverr, Freelancer, WorknHire), स्वतःचे डिजिटल पोर्टफोलिओ तयार करणे, ब्लॉगर किंवा माध्यम संस्थांसाठी कंटेंट रायटिंग करणे, तसेच पॉडकास्टिंग आणि व्हिडिओ कंटेंट क्रिएशनद्वारे स्वतःचा ब्रँड उभारणे यासारख्या संधीही गिग कार्यप्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत.

थोडक्यात, गिग कार्यप्रणालीमध्ये भाषा व साहित्य तज्ज्ञांसाठी नव्या संधी उपलब्ध होत असल्या तरी त्यांचा लाभ घेण्यासाठी तंत्रज्ञानाशी सुसंगत राहणे, डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करणे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध असलेल्या मंचांचा अभ्यास करून त्यावर आपले कौशल्य सादर करणे या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.(Sinicki, 2018)

**३.२ डिजिटल क्रांतीमुळे वाचन लेखन. आणि संभाषण या परंपरागत भाषिक कौशल्यांना मिळणारे नवे आयाम व संधींची उपलब्धता :**

**३.२.१ वाचन:** वाचनासाठी ई-बुक्स, ऑडिओ-बुक्स, पॉडकास्ट आणि डिजिटल ग्रंथालये सहज उपलब्ध झाली आहेत.

**३.२.२ लेखन:** लेखनाच्या संधींमध्ये ब्लॉगिंग, समाजमाध्यमांवरील क्षणिक साहित्य, आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने लेखनाचा समावेश आहे.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– II (B) March – April, 2025

OPEN ACCESS Original Research Article

**३.२.२ संभाषण आणि संवाद कौशल्ये :** ऑनलाईन वेबिनार्स, आभासी व्याख्याने आणि पॉडकास्टिंगद्वारे विकसित होत आहेत. त्यामुळे डिजिटल माध्यमांतून मराठी भाषा आणि साहित्यतज्ज्ञांसाठी नवी क्षितिजे खुली झाली आहेत.

**३.३ दृक्-श्राव्य आणि डिजिटल माध्यमांमध्ये भाषा आणि साहित्याच्या जाणकारांसाठी संधी :**

आधुनिक दृक्-श्राव्य माध्यमांमध्ये तसेच संगणकाधारित डिजिटल माध्यमांमध्ये मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या तज्ज्ञांसाठी विविध संधी उपलब्ध होत आहेत. डिजिटल तंत्रज्ञानामुळे मराठी भाषा, साहित्य आणि अनुवाद क्षेत्रात मोठे बदल घडून येत आहेत. तसेच या डिजिटल क्रांतीमुळे भाषा आणि साहित्यतज्ज्ञांसाठी विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**३.२.१ :- स्वयंप्रकाशन, संकेतस्थळांचे भाषांतर, कंटेंट रायटिंग आणि पॉडकास्टिंग अशा मार्गांनी डिजिटल साहित्यनिर्मितीच्या संधी :**

डिजिटल प्रकाशन आणि ई-बुक्स स्वरूपात लेखकांना स्वयंप्रकाशनाचा पर्याय खुला झाला आहे. भाषांतर आणि स्थानिकीकरण क्षेत्रात मराठीतून संकेतस्थळे, ॲप्स, आणि सॉफ्टवेअरचे भाषांतर करण्याची मागणी वाढली आहे. ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्सवर मराठी शिकवण्यासाठी संधी उपलब्ध आहेत. डिजिटल मार्केटिंग आणि समाजमाध्यमांमध्ये स्क्रिप्ट रायटिंग, कंटेंट मार्केटिंग, आणि ब्रँड कम्युनिकेशनसाठी मागणी वाढली आहे. तसेच, दृक-श्राव्य माध्यमांमध्ये पॉडकास्टिंग, ऑडिओबुक्स, आणि डिजिटल साहित्य निर्मितीच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहेत.

मराठी भाषा आणि साहित्य तज्ज्ञांसाठी गिग कार्यप्रणालीमध्ये अनेक संधी आहेत. या संधी केवळ आर्थिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या नाहीत, तर त्या भाषेच्या संवर्धनासाठी आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मराठीला स्थान मिळवून देण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

**३.२.२ आशय निर्मिती, ब्लॉगिंग, भाषांतर आणि स्थानिकीकरण :**

डिजिटल क्रांतीमुळे आशय निर्मिती आणि ब्लॉगिंग हे मोठे क्षेत्र बनले आहे. ब्लॉगिंग, माहितीपूर्ण लेखन आणि समीक्षा लेखनाद्वारे लेखकांना उत्पन्न मिळवता येते. भाषांतर आणि स्थानिकीकरण क्षेत्रात OTT प्लॅटफॉर्म्स, व्यावसायिक वेबसाइट्स आणि ॲप्ससाठी मराठीत डबिंग, उपशीर्षकलेखन आणि भाषांतराची मोठी मागणी आहे.(पाटील, 2021)

**३.२.३ ऑनलाइन शिक्षण आणि प्रशिक्षण क्षेत्रातील संधी :**

ऑनलाइन शिक्षण आणि प्रशिक्षण क्षेत्रात Udemy, Unacademy, YouTube यांसारख्या मंचांवर मराठी व्याकरण, लेखनकौशल्ये आणि साहित्य यावर कोर्स तयार करून कमाई करता येते.

**३.२.४ पटकथा लेखन आणि माध्यमांसाठी आशय विकास:**

यामध्ये वेब सिरीज, थिएटर, पॉडकास्ट आणि ऑडिओबुक निर्मितीच्या संधी आहेत. Storytel, Kuku FM, Audible यांसारख्या मंचांवर मराठी ऑडिओबुक्ससाठी व्हॉईस ओव्हर कलाकारांना मागणी आहे.

**३.३ मुक्त पत्रकारिता आणि प्रकाशन क्षेत्र:**

मुक्त पत्रकारिता आणि प्रकाशन क्षेत्रात वृत्तपत्रे, मासिके, ऑनलाइन न्यूज पोर्टल्स यांसाठी लेखन करता येते.

Amazon KDP, Google Play Books यावर स्वयंप्रकाशनाची (Self-Publishing) संधी आहे. डिजिटल विपणन आणि समाजमाध्यम व्यवस्थापन यामध्ये SEO - आधारित लेखन, कॉपीरायटिंग आणि डिजिटल मार्केटिंगद्वारे स्थानिक ब्रँड्सना मदत करता येते.

**४. गिग कार्यप्रणालीमुळे निर्माण झालेल्या समस्या, आव्हाने आणि अडचणी:**

या गिग कार्यप्रणालीमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मराठी भाषा आणि साहित्य क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी नवे मार्ग उपलब्ध होत आहेत.संधींसोबतच आर्थिक अस्थैर्य, सामाजिक सुरक्षेचा अभाव, अनिश्चिततेपोटी येणारे ताणतणाव आणि तांत्रिक आव्हाने देखील आहेत.

**४.१ सवंगपणाचा तवंग, उपयुक्ततावादाच्या प्रभावाखाली सांस्कृतिक घटकांचे अवमूल्यन आणि अतिपरिचयात् अवज्ञा:**

जागतिकीकरणानंतर केवळ भारतीय अर्थव्यवस्थाच बदलली असे नाही तर आर्थिक पायासोबतच (Base) समाज,संस्कृती, कुटुंबव्यवस्था, कला, भाषा, साहित्य ही उर्ध्वरचनाही (Superstructure) आमूलाग्र बदलली भाषा आणि साहित्य या क्षेत्रांतील बदल पाहिले तर असे लक्षात येते की, वरवर पाहाता विविध माध्यमांतून प्रकाशित होणाऱ्या साहित्यामध्ये झालेली संख्यात्मक वाढ ही एक फसवे चित्र उभे करत आहे. साहित्यिकांना आणि साहित्यकृतींना दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांच्या संख्येमधील वाढही भयावह म्हणावी इतकी प्रचंड आहे. साहित्यक्षेत्रातील या बहुप्रसवतेचा आणि पुरस्काराच्या सवंगतेचा परिणाम साहित्याच्या दर्जावर निश्चितपणे झाला आहे असे म्हणता येईल. प्रकाशनव्यवसायातील व्यावसायिकता आणि धंदेवाईकपणामधील (Thin boundaries between professionalism and commercialization) सीमारेषा धूसर झाल्या आहेत. लेखनव्यवहार आणि वाचनव्यवहार यांकडे मूल्ययुकत कृती म्हणून पाहाणे हळूहळू लोप पावत आहे. त्याऐवजी त्याची लौकिक पातळीवरील पैसा,प्रसिद्धी,मानमरातब आदी उपयुक्तता महत्त्वाची ठरते आहे साहजिकच अशा दृष्टीकोनातून लेखनवाचनव्यवहारात उतरणाऱ्या लोकांमुळे या क्षेत्राचे आणि एकंदरितच सांस्कृतिक क्षेत्राचे अवमूल्यन होते आहे. साहित्यनिर्मिती आणि प्रसारणाला तंत्रज्ञानाची जोड लाभल्याने त्याचा लोकांपर्यंत पोहोचण्याचा वेग आणि प्रमाण वाढले आहे हे खरे असले तरी 'अतिपरिचयात् अवज्ञा' या न्यायाने गांभीर्यपूर्वक वाचनाचे प्रमाण कमीच होताना दिसते आहे. दीर्घ संहितांच्या वाचनासाठी वेळ काढण्याऐवजी काही सेकंदाच्या रील्स पाहाण्याचे प्रमाण अधिक आहे. हाही दुरान्वयाने गिग कार्यप्रणालीचाच एक दुष्परिणाम म्हणता येईल. बहुसंख्य शैक्षणिक संस्था आणि शिक्षणक्षेत्र यांनाही नफेखोरीचे ग्रहण लागून तदर्थ, कंत्राटी आणि तासिका तत्त्वावरील तात्पुरत्या नियुक्त्या आणि स्वयंअर्थसाहाय्यित अभ्यासक्रमासंदर्भात गेल्या काही वर्षांतील अत्यल्प मोबदल्यावरील नियुक्त्या हाच या क्षेत्रातील शिष्टाचार होतो आहे.

**५ निष्कर्ष आणि मूल्यमापन**

थोडक्यात 'गिग अर्थव्यवस्था' या नावाने प्रचलीत होत असलेली 'गिग कार्यप्रणाली' ही आधुनिक रोजगारव्यवस्थेतील एक कळीची संकल्पना ठरत आहे. तिच्यामुळे लवचिकता आणि नव्या संधी निर्माण झाल्या

असल्या, तरीही ती अधिक प्रभावी आणि मानवाभिमुख अथवा कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित होण्यासाठी सामाजिक सुरक्षा, योग्य वेतन आणि रोजगारामधील स्थैर्य यांसारख्या बाबींचा विचार करणे गरजेचे आहे. भविष्यात गिग कार्यप्रणाली ही नोकरी आणि व्यवसाय यामधील सीमा पुसून टाकणारी, रोजगाराचा नवा अध्याय लिहिणारी संकल्पना ठरेल. डिजिटल मंचाधिष्ठित गिग कार्यप्रणाली म्हणजे तंत्रज्ञानाच्या मदतीने रोजगाराच्या संधी वाढवण्याचा मार्ग, हे खरे असले तरी त्यासोबत आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेचे कवच उभारणेही तितकेच महत्त्वाचे आहे. भविष्यातील कार्य या दृष्टीने निष्कर्षात्मक नोंद करताना सर्वच क्षेत्रातील धोरणकर्ते आणि नियोक्ते यांनी नफ्यातोट्याच्या आणि उपयुक्ततेच्या मापदंडापलीकडे जाऊन या कार्यप्रणालीमधून उद्भवणाऱ्या प्रश्नांकडे 'मानवी' दृष्टिकोनातून पाहून भविष्यवेधी धोरणे आणि व्युहरचना आखण्याची आवश्यकता आहे.

गिग कार्यप्रणालीच्या माध्यमातून मराठी भाषा आणि साहित्य या क्षेत्रांमध्ये मुक्तपणे काम करू इच्छिणाऱ्या तज्ज्ञांसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. डिजिटल माध्यमांमुळे स्वतंत्ररित्या काम करणारे लेखक, शब्दांकनकार, भाषांतरकार, पत्रकार, आणि माध्यमांच्या क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्यासाठी विस्तृत बाजारपेठ निर्माण झाली आहे. त्यामुळे नव्या तंत्रज्ञान आणि उपलब्ध मंच यांचा योग्य वापर करून मराठीतील तज्ज्ञांना जागतिक स्तरावर संधी निर्माण करता येतील.

मात्र अधिक व्यापक स्वरुपात या 'अल्पकालीन मुक्त रोजगाराधारित कार्यप्रणाली' मधून उद्भवणाऱ्या कार्यसंस्कृतीचे स्वरूप लक्षात घेतल्यास समाजासमोर काही गंभीर समस्याही यामधून उभ्या राहात आहेत. अस्थैर्य, असुरक्षितता आणि मानसिक ताणतणावाच्या छायेत वावरणारी तरुण पिढी ही, कुटुंब आणि समाजव्यवस्थेसमोर काही नवे प्रश्न उपस्थित करत आहे. यामुळेच नवभांडवलशाहीचेच (Neoliberalism) अपत्य असलेल्या गिग कार्यप्रणालीमध्ये केवळ बाजाराच्या मागणी-पुरवठारुपी यंत्रणेवर आणि भांडवलाच्या व भांडवलदारांच्या नफ्याच्या प्रेरणेवर सर्वकाही सोपवून चालणार नाही. सरकारी हस्तक्षेपाच्या माध्यमातून योग्य मोबदला आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षितता निश्चित करण्याची यंत्रणा उभी करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा मानव्यविद्या, साहित्यकला तसेच भाषा आणि साहित्याशी संबंधित विविध कलाकौशल्ये धारण करणाऱ्या कलाकारांवर व कुशल कारागिरांवर लवकरच केवळ अनिश्चिततेच्या गर्तेत गटांगळ्या खाणारे मजूर होण्याची वेळ येईल. हा एक मोठाच धोका अशा प्रकारच्या उपयुक्ततावादी आणि भांडवलधार्जिण्या शोषणकर्त्या कार्यप्रणालीला 'अर्थव्यवस्था' असे गोंडस नाव देऊन तिचे उदात्तीकरण करण्यातून होणार आहे हे लक्षात घ्यावयास हवे. प्रख्यात विचारवंत आणि नवभांडवलशाहीचे टीकाकार नोम चॉम्स्की यांनी अशा व्यवस्थेचे सखोल विश्लेषण केले आहे.(Chomsky, 2017) 'सत्ता आणि संपत्तीचे केंद्रीकरण आणि कर्मचाऱ्यांचे शोषण यांच्या माध्यमातून उभी राहीलेली एक नवी आर्थिक सरंजामशाही' असेच या व्यवस्थेचे वर्णन चॉम्स्की यांनी केले आहे.

**संदर्भ :**

1. *Cambridge Dictionary. (n.d.). Gig economy. Retrieved from https://dictionary.cambridge.org/dictionary/english/gig-economy*
2. *Chomsky, N. (2017). Requiem for the American dream: The 10 principles of concentration of wealth & power (P. D. Hutchinson, K. Nyks, & J. P. Scott, Eds.). Seven Stories Press.*
3. *गोडबोले, अच्युत. (2022). इन्फोटेक (तिसरी मराठी आवृत्ती). मधुश्री पब्लिकेशन.*
4. *India's Booming Gig and Platform Economy: Perspectives and recommendations on the future of work – Policy brief June 2022. (2022). NITI Aayog.*
5. *मोरे, प्रा. दामोदर (संपा.). (2006). संगणक आणि मराठी: शोधनिबंध संग्रह. डॉ. शकुंतला सिंग, प्रभारी प्राचार्या, जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, ठाणे.*
6. *नूलकर, डॉ. गुरुदास. (2019). अनर्थशास्त्र (अर्थशास्त्र पर्यावरण आणि विषमता) (प्रथमावृत्ती). मनोविकास प्रकाशन.*
7. *पाटील, डॉ. राहुल रजनी भालेराव. (2021, जून 11). मराठी विषयातील करियरच्या विविध संधी [ब्लॉग लेख]. Retrieved from https://drrahulrajani.com/*
8. *Sinicki, A. (2018). Thriving in the gig economy: Freelancing online for tech professionals and entrepreneurs. Apress.*

**Cite This Article:**

**प्रा. शैलेश औटी (2025).** *डिजिटल क्रांती आणि मराठी भाषा-साहित्यतज्ज्ञांसाठी गिग कार्यप्रणालीमधील संधी आणि आव्हाने.*

**In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number II, pp. 145–154).

Doi: https://doi.org/10.5281/zenodo.16270505